गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ५७ वा ● गुरुवार १३ जुलै २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| Volume 1 | Issue 57 | Date : 13/07/2023 | blow : Thursday Page 4 | Price 4

## कृष्णा भीमा स्थिरीकरण प्रकल्पाला उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा हिरवा कंदील

**मुंबई/सोलापूर : पावसाळ्यात सांगली, सातारा, कोल्हापूर भागातील महापुरात वाहून जाणारे पाणी पुणे, सोलापूर आणि मराठवाड्याच्या दुष्काळी भागाला देणाऱ्या कृष्णा खोरे 'फ्लड डायवर्जन प्रोजेक्ट'ला आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्वता मान्यता दिली आहे. माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी ही माहिती दिली. यावेळी माढा लोकसभा मतदारसंघातील आमदार जीवन गोरे, राष्ट्रवादी आमदार बबनदादा शिंदे, शिवसेना शिंदे गटाचे आमदार शहाजीबापू पाटील आदी आमदार उपस्थित होते. त्याशिवाय, जलसंपदा विभागाचे सचिव दीपक कपूर आणि इतर संबंधित शासकीय अधिकाऱ्यांसोबत आज मुंबईतील सागर बंगल्यात बैठक पार पडली.**

पावसाळ्यामध्ये कोल्हापूर सांगली आणि साताऱ्यातील काही भागात मोठ्या प्रमाणामध्ये पाऊस झाल्यानंतर कृष्णा नदीतून पाणी वाहून जाते. त्यामुळे कोल्हापूर सांगली सातारा या भागामध्ये पूरग्रस्त परिस्थिती निर्माण होते. पुराच्या परिणामी जनजीवन आणि आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणामध्ये होत असते. यासाठी खासदार रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांनी हे वाहून जाणारे अतिरिक्त पाणी दुष्काळी भागातील जनतेला उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करत आहेत. हे पाणी सातारा जिल्ह्यातील माण, खटाव फलटण, पुणे जिल्ह्यातील काही भाग, सोलापूर आणि



मराठवाडा या भागातील जनतेला दिल्यास मोठ्या प्रमाणात दुष्काळी भागातील जमीन ओलिताखाली येणार असल्याची बाब निदर्शनास खासदार निंबाळकर यांनी आणून दिली. त्यानंतर आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीची बैठक घेतली. सागर बंगल्यावर झालेल्या बैठकीत या प्रकल्पाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्वत: मान्यता दिली आहे.

हा प्रकल्प अंदाजे २० हजार कोटी रुपयांचा असून त्यासाठी लागणाऱ्या सर्वेक्षणाच्या निधीची तरतूद करण्याचे आदेश आज पारित करण्यात आले आहे. यामुळे मराठवाडा आणि सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी भागातील जनतेसाठी ही मोठी भेट असणार आहे। पान २ वर

## हिमाचलच्या पुरात १७ पुणेकर अडकले; ७ पर्यटकांशी संपर्क तुटला, शोध सुरु

पुणे : हिमाचलच्या पुरामुळे सध्या चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली असून हिमाचल प्रदेशातील लोकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. पुण्यातील काही पर्यटक तेथे सुट्टीसाठी गेले होते, ते आता पुरात अडकून पडले आहेत. एकूण १७ पर्यटक अडकले असून त्यापैकी १० जणांशी संपर्क साधण्यात आला आहे, मात्र इतर ७ पर्यटक आणि त्यांच्या कुटुंबीयांमध्ये कोणताही संवाद झालेला नाही. आता या पर्यटकांच्या कुटुंबीयांनी पुणे महानगरपालिकेकडे मदत मागितली आहे.उत्तरेकडील राज्यात सध्या मुसळधार पाऊस आणि पूरस्थिती आहे. त्यामुळे तेथील जनजीवन विस्कळीत झाले आहे. या राज्यांमध्ये जिल्ह्यातील नागरिक मोठ्या संख्येने पर्यटनासाठी जातात. ४ ते ९ जुलै दरम्यान चंदीगडहून हिमालयातील मनाली येथे पर्यटनासाठी गेलेल्या १७ जणांच्या नातेवाईकांनी जिल्हा प्रशासनाला कळवले होते मात्र त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नसल्याचं कुटुंबियांनी सांगितलं होतं.सोमवार (११ जुलै) आणि । पान २ वर

## टोमॅटोचे दर आणखी वाढणार; महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेशातून खरेदीचा केंद्र सरकारचा निर्णय



पुणे : दिल्लीतील टोमॅटोची टंचाई, दरवाढ टाळण्यासाठी केंद्र सरकार थेट टोमॅटो खरेदी करणार आहे. राष्ट्रीय कृषी सहकारी पणन महासंघ (नाफेड) आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघाला (एनसीसीएफ) केंद्राने तातडीने महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील बाजार समित्यांमधून टोमॅटो खरेदी करण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्राची खरेदी वाढल्यास राज्यातील टंचाईत आणखी भर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयाने राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ (नाफेड) आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ (एनसीसीएफ) यांना आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्रातील बाजार समित्यांमधून तत्काळ टोमॅटो खरेदी करण्याचे निर्देश दिले आहेत. खरेदी केलेला टोमॅटो दिल्ली आणि परिसरातील विक्री केंद्रातून सवलतीच्या दराने विकला जाणार आहे. शुक्रवार, १४ जूनपासून दिल्लीत सवलतीच्या दराने टोमॅटो विक्रीचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रकारामुळे महाराष्ट्रात आणखी टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे.

## विरोधी पक्षांच्या बंगळुरुतील बैठकीला सोनिया गांधी राहणार उपस्थित; भाजपविरोधात २४ पक्षांची एकजूट

नवी दिल्ली : देशभरातील राजकीय पक्षांनी भाजपविरोधात मोट बांधण्यास सुरुवात केली आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी विरोधक भाजपविरोधात एकत्र येत आहेत. याच पार्श्वभूमीवर १७ आणि १८ जुलै रोजी विरोधी पक्षांच्या बैठकीची दुसरी फेरी बंगळुरु येथे होणार आहे. या बैठकीत भाजपविरोधात २४ पक्ष एकत्र येणार आहेत. बैठकीला काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी देखील उपस्थित राहणार असल्याचं बोललं जात आहे. भाजपविरोधात होत असलेल्या पक्षांच्या बैठकीत शिवसेना ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे देखील उपस्थिती दर्शवणार आहेत. तर पीडीपी पक्षाचे अध्यक्ष मेहबूबा मुफ्ती हे देखील या बैठकीत उपस्थित असणार आहेत. त्यावरून आता भाजपने उद्धव ठाकरे यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे.

गेल्या वर्षी भाजपशी संबंध तोडून नितीश कुमार महाआघाडीत सामील झाले होते. तेव्हापासून विरोधी पक्षांना एकत्र करण्याचे प्रयत्न त्यांनी सुरू केले आहेत. गेल्या काही महिन्यांत विविध राज्यांचा दौरा करून त्यांनी अनेक विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या भेटी घेतल्या आहेत. यानंतर २३ जून रोजी त्यांनी बिहारची राजधानी पाटणा येथे विरोधी पक्षांची मोठी बैठक बोलावली. या सर्वसाधारण बैठकीत १५ पक्षांचे २७ नेते सहभागी झाले होते. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि के सी वेणुगोपाळ देखील या बैठकीत उपस्थित होते.

यावेळी भाजपविरोधातील विरोधकांचं कुळ मोठं होणार असल्याचं बोललं जात आहे. एमडीएमके, केडीएमके, व्हीसीके, आरएसपी, । पान २ वर

## राज्यात धावणार 'जन-शिवनेरी' बस
### 'शिवशाही' बसच्या दरात 'शिवनेरी'मधून प्रवास

मुंबई : मुंबई-पुणे दरम्यान धावणाऱ्या एसटी महामंडळाच्या शिवनेरी बसेस आता महाराष्ट्रातील इतर मार्गावरही चालवण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या शिवनेरी बसचे प्रवास भाडे हे शिवशाही बस इतकं असणार आहे. त्यामुळे प्रवाशांना आणखी आरामदायी प्रवास करता येणार आहे. सध्या जन-शिवनेरी बस ही प्रायोगिक तत्वावर नाशिक-पुणे (शिवाजीनगर) या मार्गादरम्यान चालवण्यात येत आहे. त्याला प्रवाशांची चांगलाच प्रतिसाद दिला आहे.

येत्या काळात मुंबई-पुणे मार्गावर धावत असलेल्या शिवनेरी बसेस ऐवजी ई-शिवनेरी बसेस धावणार आहेत. त्यामुळे तब्बल १०० शिवनेरी बसेस या महाराष्ट्रातील इतर मार्गावर जन-शिवनेरी या नावाने चालवण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे शिवनेरी बसचे तिकीट दर हा १६ रुपये ८० पैसे प्रति टप्पा (२.८० रुपये/किमी) इतका आहे. 'जन शिवनेरी'साठी तो १२:९० रुपये प्रति टप्पा इतका (म्हणजे रु २/किमी) ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे मुंबई वगळता महाराष्ट्र इतर शहरादरम्यान धावणाऱ्या जन-शिवनेरी या बसेस सध्याच्या शिवशाही बसच्या जवळपास तिकीट दरात धावणार आहेत.

अत्यंत सुरक्षित, अत्याधुनिक सेवा-सुविधांनी युक्त असलेली वातानुकूलित शिवनेरी बससेवा मुंबईच्या बाहेर जन-शिवनेरी या नावाने चालविण्यात येत आहे. प्रायोगिक तत्वावर नाशिक-पुणे (शिवाजीनगर) मार्गावर १० जुलैपासून विनावाहक सुरू करण्यात आलेली या जन-शिवनेरी बससेवेला प्रवाशांचा उदंड प्रतिसाद लाभला आहे.

वोल्वो आणि स्कॅनिया या कंपनीच्या अत्याधुनिक शिवनेरी बसेस अत्यंत माफक दरामध्ये नाशिक-पुणे (शिवाजीनगर) या मार्गावर जन-शिवनेरी या नावाने धावत आहेत. दिवसभरात त्यांच्या १८ फेऱ्या होतात. या बसचे नाशिक-पुणे (शिवाजीनगर) प्रवासाचे भाडे ५०० रुपये असून महिलांना ५० टक्के सवलतीमुळे केवळ २५५ रुपयांत या अत्याधुनिक, सुरक्षित आणि वातानुकूलित बससेवेचा लाभ घेणे शक्य झाले आहे. लवकरच राज्यातील इतर काही मार्गावर जन-शिवनेरी ही सर्वसामान्यांसाठी माफक दरातील अत्याधुनिक व वातानुकूलित बससेवा सुरु करण्याचा एसटी महामंडळाचा प्रयत्न आहे.

## न्यासाकडे नोंदणी असलेल्या संस्थांना, संघटना गृहित धरुन अधिस्वीकृती समित्यांवर नियुक्त्या, माहिती विभागाचा अजब कारभार

मुंबई : धर्मदाय आयुक्त यांच्याकडे सोसायटी व ट्रस्ट ॲक्ट अंतर्गत नोंदणी असलेल्या सेवाभावी संस्थांना पत्रकार संघटना गृहित धरुन अधिस्वीकृती समितीवर सदस्य म्हणुन नियुक्ती देण्यात आली आहे. न्यास नोंदणीचा व संघटना नोंदणीचा स्वतंत्र कायदे आणि विभाग आहेत. असे असताना माहिती आणि जनसंपर्क विभागाने थेट पत्रकारांच्या सेवाभावी संस्थांनाच संघटना गृहित धरले आहे. याबाबत चौकशी करुन चुकीचे प्रस्ताव मंजुर करणार्या संबंधितांवर कारवाई





करावी अन्यथा राज्यभर आंदोलन करण्यात येईल असा इशारा देत न्यायालयातही दाद मागणार असल्याचे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क विभागाने ११ जुलै २०२३ रोजी राज्य अधिस्वीकृती व विभागीय अधिस्वीकृती समिती गठित करण्याबाबत शासन निर्णय जारी केला. प्रसारमाध्यमांशी संबंधित व्यक्तींना अधिस्वीकृती देण्यासंबंधी सदरील समिती निर्णय घेते. दि. १९ सप्टेंबर २००७ रोजीच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीवर एकूण २७ आणि ९ विभागीय समित्यांवर ४५ सदस्यांची नेमणूक केली जाते. पूर्वीच्या समित्यांची मुदत संपल्यानंतर मध्यंतरी महाविकास आघाडी सरकारने याबाबत कुठलाच निर्णय घेतला नाही. राज्यभरातील पत्रकारांच्या संघटनांनी सातत्याने मागणी लावून धरल्यानंतर अखेर याबाबतचा आदेश निघाला. याच आदेशामध्ये मराठी पत्रकार परिषद या संघटनेवर प्रशासक नियुक्त असल्याबाबत धर्मदाय । पान २ वर

## राज्यात ७ अपिलीय न्यायाधिकरण स्थापनेच्या प्रस्तावाला मान्यता : मंत्री सुधीर मुनगंटीवार

नवी दिल्ली : वस्तू व सेवाकर परिषदेच्या ५० व्या बैठकीत महाराष्ट्रामध्ये ७ अपिलीय न्यायाधिकरण (ट्रिब्युनल) स्थापनेच्या प्रस्तावाला मान्यता मिळाल्याचे वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज येथे सांगितले.

वित्त मंत्रालयाच्यावतीने आज वस्तू आणि सेवा कर परिषदेची ५० वी बैठक येथील विज्ञान भवनात आयोजित करण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी अर्थमंत्री निर्मला सीतारामन होत्या. बैठकीत अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे अर्थमंत्री आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्याचे वन मंत्री सुधीर मुनगंटीवार या परिषदेस राज्याच्यावतीने उपस्थित होते. यासह राज्याचा वित्त सचिव शैला ए. आणि जीएसटी आयुक्त राजीव कुमार मित्तल उपस्थित होते. आज पार पडलेल्या ५०व्या



बैठकीत विशेष टपाल तिकीट जारी करण्यात आले.

बैठकीनंतर मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी सांगितले, आज झालेल्या वस्तू व सेवाकर परिषदेच्या महत्वाच्या बैठकीत राज्यात वस्तू व सेवाकराशी निगडीत तक्रारींचा जलद निपटारा करण्यासाठी राज्यात ७ अपिलीय न्यायाधिकरण असावे, अशी राज्याची मागणी होती. आजच्या बैठकीत ही मागणी मंजुरी करण्यात आली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. ऑनलाईन खेळ, घोड्याची शर्यत (हॉर्स रेसिंग), कॅसीनो या बाबींवर आता २८% टक्के कर आकारण्यात येणार असल्याचेही श्री. मुनगंटीवार यांनी यावेळी सांगितले. कायद्यामध्ये ऑनलाईन हा शब्द नसल्याने यासंदर्भात काही खटले न्यायालयात दाखल करण्यात आले होते. आता मात्र कायद्यात अतिशय स्पष्टता आणण्यात आल्यामुळे ऑनलाईन गेमिंगचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे राज्याच्या महसुलात निश्चितच भर पडेल, असेही मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी यावेळी नमूद केले.

## जलयुक्त शिवार अभियानातील कामांची गती वाढवावी : जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर
### जिल्ह्यात गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अभियानाची प्रभावी अंमलबजावणी

सोलापूर/प्रतिनिधीः जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत प्राथमिक आराखड्यानुसार ९३ कोटी ९२ लाखाची २ हजार ८९६ कामे प्रस्तावित करण्यात आली होती. त्यातील १ हजार ९४० कामांना मंजुरी देऊन त्यातून ८६५ कामे सुरू झाली. सुरू झालेल्या कामातून ५७७ कामे पूर्ण झाली आहेत. कामांची ही गती खूपच कमी असल्याने संबंधित सर्व शासकीय यंत्रणांनी जलयुक्तच्या कामांची गती वाढवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जलयुक्त शिवार अभियान २.० आढावा बैठकीत जिल्हाधिकारी शंभरकर बोलत होते. यावेळी जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा, उपजिल्हाधिकारी चारुशीला देशमुख, कृषी उपसंचालक राजकुमार मोरे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी सर्वश्री डी.एस. कदम, आर.डी. क्षीरसागर, जे.के.बंकापुरे, एच. सी. समताळे संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### अभियानात ६१ कामामधून ११.५० लाख घन मीटर गाळ काढण्यात आला, गाळ काढण्यात सोलापूर जिल्हा राज्यात प्रथम

जिल्हाधिकारी शंभरकर पुढे म्हणाले की, जलयुक्त शिवार अभियान २.० हे राज्य शासनाचा प्राधान्यशील उपक्रम आहे. त्यामुळे सर्व संबंधित विभागानी जलयुक्त मध्ये मंजूर करण्यात आलेली सर्व कामे सुरू करणे अनिवार्य आहे. कृषी, भूजल, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा या विभागांनी जलयुक्त अंतर्गत मंजूर असलेली कामे सुरू केलेली दिसून येत नाहीत, तरी या विभागप्रमुखांनी पुढील १५ दिवसात ही कामे सुरू करून विहित वेळेत पूर्ण करून घ्यावीत, असे निर्देश त्यांनी दिले. गाळमुक्त धरण व गाळ युक्त शिवार योजनेची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणेनी दक्षता घ्यावी. जिल्ह्यातील अकरा तालुक्यात १०९ कामांना प्रशासकीय मान्यता दिलेली होती त्यातील ६१ कामे पूर्ण झाली आहेत. तरी उर्वरित सर्व कामे तात्काळ सुरू करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी शंभरकर यांनी दिले. सद्यस्थितीत गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अंतर्गत सुरू । पान २ वर

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## * सुविचार *

छटाकभर प्रेम शेरभर ज्ञानापेक्षा वरचढ असते.- जॉन वेरली

## संपादकीय

### त्या नेत्यांवर कडक कारवाई व्हावी

आमदार गीता जैन यांनी ठेक्यावर नेमलेल्या कनिष्ठ अभियंत्यास सार्वजनिकरीत्या कानफटात मारली. एका बिल्डरच्या तक्रारीवरून पावसाळ्यात राहते घर तोडण्याची कारवाई करण्यात आली. मीरा-भाईंदर महापालिकेचे प्रभाग अधिकारी सचिन बच्छाव यांच्याच आदेशावरून संबंधित अभियंत्याने हे काम केले होते; परंतु, त्याबद्दल मार त्यालाच खावा लागला. त्याबद्दल त्याने आवाज उठवून संबंधित आमदाराला अद्दल घडवण्याची आवश्यकता होती. मात्र, प्रत्यक्षात या अभियंत्याने पोलिसात केलेली तक्रार मागे घेतली असून उलट जैन यांची भेट घेऊन आपल्या भावाच्या लग्नाचे आमंत्रणही त्यांना दिले आहे. जैन या भाजप समर्थक आमदार असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची जाहीरपणे कानउघाडणी करणे आवश्यक होते. पण तसे घडलेले नाही. दुसरीकडे ठाकरे गटाच्या वांद्रे येथील शाखेचे पाडकाम करण्याच्या कारवाईत सहभागी असलेल्या सहायक अभियंत्यास शिवसैनिकांनी मारहाण केली. या अभियंत्याने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो असलेल्या फलकावरदेखील हातोडा चालवला, असा आरोप ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत तसेच माजी परिवहनमंत्री अनिल परब यांनी केला. राज्यात शिंदे-फडणवीस सरकार असल्यामुळे त्यांच्या पक्षाच्या आमदारांनी काहीही केले तरी ते खपवून घेतले जाते आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांवर मात्र तत्काळ कारवाई केली जात आहे. यापूर्वी महाविकास आघाडीच्या किंवा लोकशाही आघाडीच्या कार्यकाळातही असा पक्षपात होत होता. अनेकदा पालिका वा शासकीय कर्मचारी नागरिकांशी दुर्वर्तन करतात व पैसे खातात, अशांबाबत राजकीय पक्षाने हिंसक नव्हे, पण आक्रमक पवित्रा धारण करणे हे योग्यच असते, परंतु कायदा हातात घेण्याचा कोणालाही अधिकार नसतो. मात्र, चॅनेलवाल्यांच्या साक्षीने प्रदर्शन करण्याची अनेक नेत्यांना सवय असते. मविआ सरकार असताना केंद्रीयमंत्री नारायण राणे यांनी रायगड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या दुर्घटना स्थळाला भेट दिली. तेव्हा तेथील ज्येष्ठ सरकारी अधिकाऱ्यांना दम देताना तुमच्या दिशेने या संतप्त जमावाला सोडू का, अशी भाषाही त्यांनी वापरली होती. त्यांचे चिरंजीव आमदार नितेश राणे यांनी तर कोकणात एका अभियंत्याचे बकोट पकडून, त्याला बांधून मारझोड केली होती. शासन व्यवस्था लोकांप्रती उत्तरदायी बनवण्यासाठी मूलगामी सुधारणा करण्याऐवजी, या प्रकारची सवंग लोकप्रियता मिळवून देणारे उपद्व्याप नेत्यांकडून केले जातात. अशा नेत्यांवर कडक कारवाई होण्याची आवश्यकता आहे.

पान १ वरुन

### विरोधी पक्षांच्या बंगळुरुतील..

मुस्लिम लीग, केरळ काँग्रेस (जोसेफ), केरळ काँग्रेस (मणी) हे १७-१८ जुलै रोजी बंगळुरू येथे होणाऱ्या बैठकीत सहभागी होणार आहेत. यावेळी होत असेलल्या विरोधी पक्षांच्या बैठकीत एकूण २४ पक्ष सहभागी होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सर्व विरोधी पक्षांच्या नेत्यांना बंगळुरूमध्ये होणाऱ्या बैठकीचं निमंत्रण दिलं आहे. १७ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता सर्वांसाठी रात्रीचं जेवण ठेवण्यात आलं आहे आणि १८ जुलै रोजी सकाळी ११ वाजल्यापासून मुख्य बैठक सुरू होणार आहे. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री शिवकुमार यांनी सांगितल्याप्रमाणे, मल्लिकार्जुन खर्गेंनी सोनिया गांधी यांना देखील या बैठकीला उपस्थित राहण्याचं आवाहन केलं आहे.

पाटणा येथे झालेल्या सर्वसाधारण सभेनंतर तब्बल २५ दिवसांनी दुसरी सभा होणार आहे. पण मधल्या काळात शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची कहाणी पूर्णपणे बदलली. शरद पवार यांचे पुतणे अजित पवार बंडखोरी करून भाजप-शिंदे सरकारमध्ये सामील झाले. त्यांच्यासोबत राष्ट्रवादीचे ४० आमदार असल्याचा त्यांचा दावा आहे. एवढंच नाही तर अजित पवार यांनी राष्ट्रवादीवर दावाही केला आहे. राष्ट्रवादीचा हा लढा निवडणूक आयोगापर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे येत्या काळात राजकारणात मोठे बदल होण्याची शक्यता आहे.

### न्यासाकडे नोंदणी असलेल्या ..

सहआयुक्त पुणे यांनी कळवले असुन प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने संघटनेच्या सदस्यांची नियुक्ती मा. उच्च न्यायालय उक्त निकालाच्या अधिन करण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या संघटनेचे राज्य समितीवर पाच आणि विभागीय समितीवर नऊ असे १४ सदस्य घेण्यात आलेले आहेत. याच पध्दतीने महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघटना तीन, महाराष्ट्र संपादक परिषद दोन, मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघ एक, बृह्नमहाराष्ट्र जिल्हा वृत्तपत्र संपादक संघ एक, महाराष्ट्र दैनिक वृत्तपत्र संघटना एक आणि महाराष्ट्र साप्ताहिक वृत्तपत्र संपादक परिषद एक असे सदस्य घेण्यात आले आहेत.

धर्मदाय आयुक्त यांच्याकडे संस्था नोंदणीसाठी १८६० सोसायटी आणि १९५० ट्रस्ट कायद्यांतर्गत सेवाभावी संस्थांची नोंदणी केली जाते. तर असंघटित क्षेत्रात काम करणार्या मानधन, पगार घेणार्या कामगारांसाठी कामगार कायदा (लेबर युनियन ॲक्ट) १९२६ अंतर्गत नोंदणी केली जाते. या कायद्यांतर्गत नोंदणी असणार्या संघटनांनाच आपल्या न्याय हक्कांसाठी आंदोलन, मागणी, उपोषण करण्याचा अधिकार आहे. धर्मदाय यांच्याकडे न्यासा अंतर्गत नोंदणी असलेल्या संस्था या सेवा म्हणुनच काम करतात. यात रस्त्यावर उतरुन आंदोलने किंवा मागण्या करता येत नाहीत. सेवाभावी संस्था आणि श्रमिक संघटनांसाठी स्वतंत्र विभाग आणि कायदे असताना महाराष्ट्रात बहुतांशी पत्रकारांनी धर्मदाय आयुक्त यांच्याकडेच नोंदणी करुन सदरील प्रमाणपत्रे दाखल केली आहेत. माहिती आणि जनसंपर्क विभागासह सामान्य प्रशासन विभागानेही कोणतीही खातरजमा न करता काही लोकांच्या प्रभावामुळे चुकीच्या पध्दतीने अधिस्वीकृती समितीवर सदस्यांची नियुक्ती केली आहे.

मराठी पत्रकार परिषद या एकाच संस्थेच्या १४ जणांना सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे चुकीच्या पध्दतीने संस्थांना संघटना दाखवून सदस्यांची नियुक्ती प्रक्रिया करणार्या अधिकार्यांवर तात्काळ कारवाई करावी आणि नियमानुसार कामगार आयुक्त यांच्याकडे कामगार कायद्यांतर्गत नोंदणी असलेल्या संस्थांना प्राधान्य द्यावे. अन्यथा राज्यभर आंदोलन करण्यात येईल असा इशारा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे, विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी यांनी दिला आहे.

## शंखी गोगलगाय; नियंत्रणासाठी उपाययोजना

**सध्या खरीप हंगाम सुरु आहे. बळीराजाची पेरणीची लगबग सुरु असून चांगलं पीक येण्यासाठी अनेक उपाययोजना शेतकरी करतात. परंतु मागील दोन-तीन वर्षापासून ढगाळ, आर्द्रता युक्त जास्त काळ ओलावा असणारे वातावरण राहिल्याने शंखी गोगलगायीची संख्या वाढत आहे. त्यांच्यामुळे पिकांना धोका पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही. शंखी गोगलगायीचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी एकात्मिक व्यवस्थापन आवश्यक आहे. त्याविषयी कृषि विभागाने दिलेली माहिती...**

शंखी गोगलगाय साधारणपणे पाच ते सहा वर्ष जिवंत राहते. जीवनक्रम अंडी, पिल्ले आणि प्रौढ अशा तीन अवस्था मध्ये पूर्ण होतो. हिवाळ्यात सुप्तावस्थेमध्ये जाण्याचे प्रमाण खूप जास्त आहे. शंखी गोगलगायीचा प्रसार शेतात वापरण्यात येणारी औजारे, यंत्रसामग्री, वाहने, बैलगाडी, शेणखत, विटा, माती, वाळू, रोपे, बेणे, कुंड्या इत्यादी मार्फत होतो.या गोगलगायी रात्रीच्या वेळी पानांना, फुलांना अनियमित व मोठ्या आकाराची छिद्र पाडून पानांच्या कडा खातात. काही प्रमाणात झाडांच्या शेंगा, फळे, कोवळ्या सालीवर देखील उपजीविका करुन पिकांचे नुकसान करतात. गोगलगायींचे प्रामुख्याने लक्ष रोप अवस्थेत असते. या अवस्थेत रोपांची शेंडे कुरतडून खातात. त्यामुळे पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

**नियंत्रणासाठी उपाययोजना**

पिकाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यासाठी गोगलगायीची अंडी हाताने गोळा करुन नष्ट करावीत, जेणेकरुन त्यांचा जीवनक्रम नष्ट होईल. उन्हाळ्यात जमिनीची खोल नांगरट करावी. फळझाडाच्या खोडाला १० टक्के बोर्डोपेस्ट लावल्यास गोगलगायी झाडावर चढत नाहीत. शेताच्या बांधाच्या जवळ दोन्ही बाजूने १ ते २ फुटाचे चर काढावेत.



संध्याकाळी व सुर्योदयापूर्वी बाहेर आलेल्या तसेच झाडावर लपलेल्या गोगलगायी हाताने गोळा करुन साबणाच्या द्रावणात बुडवाव्यात आणि खड्ड्यात पुरुन टाकाव्यात किंवा रॉकेल मिश्रित पाण्यात बुडवून माराव्यात. गोगलगायी आकर्षित होण्यासाठी गोणपाट गुळाच्या पाण्याच्या द्रावणात बुडवून संध्याकाळी शेतात ठिकठिकाणी ठेवावेत. सकाळी सुर्योदयानंतर त्या पोत्याखाली गोळा झालेल्या गोगलगायी जमा करुन नष्ट कराव्यात.

गोगलगायींना शेतातील मुख्य पिकांवर प्रादुर्भाव करण्यापासून परावृत्त करण्यासाठी तंबाखूची किंवा चुन्याची भुकटी किंवा कॉफीची पूड यांचा ४ इंच लांबीचा पट्टा किंवा राखेचा सुमारे २ मीटर लांबीचा पट्टा बांधाच्या शेजारी टाकावा. गोगलगायींचे नैसर्गिक शत्रू असलेल्या कोंबडी, बदक इत्यादी भक्षकांचे संवर्धन करावे. निंबोळी पावडर,निंबोळी पेंड, ५ टक्के निंबोळी अर्क या वनस्पतीजन्य कीटकनाशकाचा वापर बांधावर केल्यास गोगलगायी शेतात येण्यापासून परावृत्त होतात.

मेटाल्डिहाईलला पर्याय म्हणून आयर्न फॉस्फेटचा वापर २ किलो प्रती एकर या प्रमाणात अमिष म्हणून करता येतो. आयर्न फॉस्फेट पाळीव प्राणी व इतर प्राण्यांना सुरक्षित असल्याने त्याचा गोगलगायीच्या निर्मुलनासाठी उपयोग शेतकऱ्यांनी करावा. अशा प्रकारच्या व्यवस्थापनाद्वारे नियंत्रण ठेवल्यास शंखी गोगलगायीचा प्रादुर्भाव रोखण्यास निश्चितच मदत होईल.

**-गीतांजली अवचट, उपसंपादक विभागीय माहिती कार्यालय,पुणे**

## अनमोल रत्ने आणि त्यांच्याशी निगडित रोचक आख्यायिका

आपल्या संस्कृतीमध्ये अनमोल रत्नांचा वापर करण्याची परंपरा फार प्राचीन काळापासून चालत आली आहे. रत्नांचा वापर केवळ आभूषणांसाठी नाही, तर पारंपारिक पोशाख, शस्त्रास्त्रे, इतर शोभेच्या वस्तू यांमध्येही केला जात असे. किंबहुना, आताच्या काळामध्ये अनमोल रत्नांचा मनमोकळा वापर हा सर्रास परवडण्याजोगा नसला, तरी प्राचीन काळी राजा महाराजांच्या संग्रही अनमोल रत्नांची रेलचेल असे. यांपैकी अनेक अनमोल रत्नांशी निगडीत रोचक आख्यायिका अस्तित्वात आहेत. या आख्यायिकांच्या बद्दल जाणून घेऊ या.



अनमोल रत्नांमध्ये सर्वात 'लहरी' रत्न म्हणून कुठले असेल, तर ते म्हणजे नीलम. नीलम या रत्नाला हिंदू धर्मातच नाही, तर ख्रिश्चन धर्मामध्येही मोठे महत्व आहे. ख्रिश्चन धर्मामध्ये, धर्मगुरु नीलम धारण करीत असत. त्यांनी धारण केलेला नीलम हा पावित्र्याचे आणि प्रामाणिकपणाचे प्रतीक मानला जात असे. किंबहुना ख्रिश्चन धर्मामध्ये सर्वतोपरी मानल्या जाणाऱ्या 'टेन कमांडमेंटस' मूळ रूपात नीलम रत्नाच्या पटावर लिहिल्या गेल्या असल्याची मान्यता ही रूढ आहे. हिंदू धर्मामध्ये नीलम शनीचे रत्न मानले जाते. धारण केले गेलेले नीलम रत्न लाभल्यास अतिशय फायदा करविणारे, तर न लाभल्यास मोठ्या नुकसानालाही कारणीभूत ठरू शकते. ब्रिटीश संस्कृतीमध्ये नीलम हा वाईट नजरेपासून बचाव करण्यासाठी धारण केला जात असे.

माणिक या रत्नाचा वापर भारतीय संस्कृतीमध्ये पहिल्या शतकापासून केला जात आल्याचे उल्लेख सापडतात. त्या काळी या रत्नाला 'रत्ननायक', म्हणजेच समस्त रत्नांचा प्रमुख म्हणून ओळखले जात असे. देवतांच्या आशीर्वादाने हे रत्न पृथ्वीवर अवतरले असल्याची मान्यता पुराणांमध्ये उल्लेखली असून, त्याच कारणास्तव देवतांना प्रसन्न करून घेण्यासाठी हे रत्न देवतांच्या चरणी अर्पण केले जात असे. अस्सल माणिक रत्नाचा उल्लेख 'ब्राह्मण' म्हणून केला जात असून, हे रत्न सर्वोत्तम समजले जात असे. हे रत्न धारण करणाऱ्याला कुठल्याही नकारात्मक गोष्टीपासून संरक्षण मिळत असे, तसेच संपन्नता, सुबत्ता मिळवून देणारे हे रत्न मानले जात असे. 'गार्नेट' हे रत्न शारीरिक बल व मानसिक धैर्य वाढविणारे म्हणून धारण करण्याची परंपरा होती. या रत्नामध्ये उर्जा इतक्या मोठ्या प्रमाणात होती, की अनेक गार्नेट एकत्र एखाद्या ठिकाणी ठेवले गेल्यास तो कक्ष प्रकाशाने उजळून निघत असे, आणि ही रत्ने पाण्यामध्ये टाकल्यास पाणी उकळू लागत असल्याचे म्हटले जात असे.

पाचू हे रत्न संपन्नतेचे, सुबत्तेचे प्रतीक आहे. ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकापासून भारतामध्ये या रत्नाचा वापर प्रचलित असल्याचे उल्लेख पहावयास मिळतात. केवळ भारतातच नव्हे, तर बॅबिलोनियन बाजारपेठांमध्येही हे रत्न ख्रिस्तपूर्व चार हजार वर्षांपासून अस्तित्वात असल्याचे म्हटले जाते. हिंदू पौराणिक कथांच्या अनुसार वल नामक एका दैत्याचा वध देवतांनी केल्यावर त्याच्या शरीराचे तुकडे सर्वत्र विखुरले. त्याच्या शरीराच्या तुकड्यांपासून अनेक रत्नांची निर्मिती झाल्याची आख्यायिका असून, त्याच्या रक्तापासून माणिके, दातांपासून मोती, तर यकृतातील हिरव्या पित्तरसामुळे पाचू तयार झाले असल्याचे म्हटले जाते ! ओपल या रत्नाचा इतिहास मात्र वादातीत आहे. अरब संस्कृतीमध्ये, वीज कोसळल्याने या रत्नाचे निर्माण झाले असल्याचे म्हटले जात असून, विज चमकताना आकाशामध्ये दृष्टीस पडणारे सर्व रंग या रत्नामध्ये उतरून आले असल्याची मान्यता आहे. ग्रीक संस्कृतीमध्येही या रत्नाला मोठे महत्व होते. या रत्नाला खरी प्रसिद्धी लाभली, ती राणी व्हिक्टोरियामुळे. ओपल हे रत्न तिच्या खास आवडीचे असून तिने अनेक आभूषणे बनवून घेण्यासाठी या रत्नाचा वापर केला. मात्र तिच्या राज्याभिषेकाच्या वेळी जेव्हा तिचा पोशाख अचानक खराब झाला, तेव्हा तो या रत्नामुळेच झाला असे समजून तिने हे रत्न वापरणे सोडून दिले.

ओपल रत्नाशी निगडीत आणखी एक रोचक कथा, स्पेनचे राजे आल्फोन्सो (बारावे) यांच्याशी निगडित आहे. राजे आल्फोन्सो सरदार घराण्यातील एका अतिशय सुंदर तरुणीच्या प्रेमात पडले खरे, मात्र शाही खानदानाच्या रीतीला अनुसरून त्यांना विवाह मात्र राजकुमारी मर्सिडिसशी करावा लागला. त्यांच्या विवाहाप्रीत्यर्थ आल्फोन्सोच्या प्रेयसीने एक अतिशय देखणी ओपल रत्नाची अंगठी राजकुमारी मर्सिडिससाठी भेट म्हणून पाठविली. ही अंगठी धारण केल्यानंतर अवघ्या दोनच महिन्यामध्ये मर्सिडिसचा दुर्दैवी मृत्यू झाला.

तिच्या मृत्यूनंतर आल्फोन्सोने ही अंगठी आपल्या आजीला, म्हणजेच राणी क्रिस्टीनाला भेट म्हणून दिली. ही अंगठी धारण केल्यानंतर राणी क्रिस्टीनाचा देखील लवकरच मृत्यू झाला. त्यानंतर राजाने ही अंगठी स्वत:च्या बहिणीला आणि तिच्यानंतर स्वत:च्या भावजयीला धारण करण्यास दिली असता, त्यांचा ही दुर्दैवी मृत्यू झाला. त्यानंतर राजाने ही अंगठी स्वत: धारण केली असता, तोही अकस्मात निधन पावला. अश्या प्रकारे हे रत्न शापित ठरविले गेले खरे, पण काही इतिहासकारांच्या मते, बहुतेक सर्वच व्यक्तींच्या मृत्यूशी ओपल रत्न शापित असण्याचा काही एक संबंध नसून, त्याकाळी स्पेनमध्ये पसरलेल्या कॉलराच्या साथीमुळे बहुतेक व्यक्तींचे मृत्यू झाल्याची शक्यता असल्याचे म्हटले आहे.

## मुलांना वेळ देणे शक्य नसलेल्या पालकांनी 'हे' कराच!

आजकल रोजच्या धकाधकीच्या जीवनात सर्वच जण शर्यतीत धावत असतात. या स्पर्धेच्या युगात त्यांना स्वत:साठीही वेळ देणं कठीण झाले आहे. त्यातच लहान मुले असतील आणि आई-वडील दोघेही नोकरीला जाणारे असतील तर मुलांसाठी वेळ काढणं मुश्किल होतंय. प्रत्येक पालकांना आपल्या मुलांसह क्वालिटी टाईम व्यतीत करायचा असतो. परंतु, नोकरी आणि घर अशा दोन्ही गोष्टी सांभाळताना अनेकांना तारेवरची कसरत करावी लागते. परंतु या सगळ्यामधून वेळ काढून काही सोप्या पद्धतीने तुम्ही मुलांना वेळ नक्की देऊ शकता.

**मोबाईलपासून दूर राहा**घरी असताना पालकांनी मोबाईल, लॅपटॉप यांसारख्या गोष्टी बाजूला सारून तो वेळ आपल्या मुलांसह व्यतीत करा. त्यामुळे मुलं दिवसभरातील त्यांनी केलेल्या गोष्टी तुम्हाला सांगू शकतील. **शॉपिंगसाठी शक्यतो बाहेर पडू नका**जर तुम्ही घरी असाल तर शॉपिंगसाठी शक्यतो घराबाहेर पडू नका. अतिशय गरज असेल तिथेच बाहेर पडा. शॉपिंगच्या वेळेत तुमच्या लहान मुलांसोबत खेळा. त्यांच्याशी गप्पा मारा.**नियमित व्यायाम करा**जर तुम्ही नियमित व्यायाम करत असाल तर तुमच्यासोबत तुमच्या मुलांनाही त्यात सामिल करा. त्यांनाही तुमच्यासोबत मॉर्निंग वॉकसाठी बाहेर घेऊन जा. त्यामुळे त्यांनाही चांगल्या सवयी लागून आरोग्यही उत्तम राखण्यास मदत होईल. त्यासोबतच तुम्ही एकमेकांसोबत अधिक वेळ घालवू शकाल.**सोशल साइट्सवर कमी वेळ द्या**आजकल सर्वच पालक फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲपसारख्या सोशल साइट्सवर ॲक्टिव्ह असतात. त्यामुळे मुलांना कमी वेळ दिला जातो. सोशल साइट्सपेक्षा मुलांसोबत खेळा, त्यांच्यासोबत फिरायला जा, त्यामुळे तुम्हाला अधिकाधिक वेळ मुलांसोबत मिळू शकतो.

### जलयुक्त शिवार अभियानातील..

असलेल्या ६१ कामांमधून ११.५० लाख घनमीटर इतका गाळ काढण्यात आलेला असून सुमारे पंधराशे एकर क्षेत्रामध्ये हा गाळ पसरविण्यात आलेला आहे. यामुळे ११५ कोटी लिटर अतिरिक्त पाणीसाठा निर्माण झालेला आहे, ही बाब अत्यंत चांगली असल्याचे जिल्हाधिकारी शंभरकर यांनी सांगितले. त्याच पद्धतीने उर्वरित कामे यंत्रणांनी पूर्ण करून घ्यावेत असे आवाहन ही त्यांनी केले.

जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री. क्षमा यांनी गाळमुक्त धरण व गायुक्त शिवार योजनेत जिल्ह्याची सद्यस्थिती सांगितली. तसेच या योजनेमध्ये २५ अशासकीय संस्था सहभागी झाल्या असून अंदाजे १५०० शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे. तर अन्य दोन संस्थांनी यात सहभागी होण्यासाठी प्रस्ताव दिले असून समितीच्या परवानगीने त्यांना सहभागी करून घेतले जाणार आहे. त्याप्रमाणेच जिल्ह्यात पूर्ण झालेल्या ६१ कामामधून ११.५० लाख घन मीटर इतका गाळ काढण्यात आल्याची माहिती देऊन सोलापूर जिल्हा गाळ काढण्यामध्ये राज्यात प्रथम असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी शंभरकर यांनी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.०, जलशक्ती अभियान व अमृत सरोवर अभियान आदिचा सविस्तर आढावा घेऊन संबंधित यंत्रणांना मार्गदर्शक सूचना दिल्या.

### कृष्णा भीमा स्थिरीकरण

यामुळे भविष्यात दुष्काळी भागाचा कायमस्वरूपी शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न यामुळे मिटून हा संपूर्ण भाग ओलिताखाली येणार आहे. यामुळे रोजगार मोठ्या प्रमाणामध्ये उपलब्ध होणार आहे. हरित क्रांती बरोबर आर्थिक क्रांती होणार असून महाराष्ट्रातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प ठरेल, असे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्यातील गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा व पश्चिम किनारा (कोकण) या पाच प्रमुख नद्यांच्या खोर्यांतून उपलब्ध होणार्या एकूण ४७५८ अब्ज घनफूट पाण्यापैकी १०७९ अब्ज घनफूट पाणी कृष्णा खोर्यातून उपलब्ध होते.

महाराष्ट्रातील एकूण प्रमुख पाच नदी खोर्यांपैकी एकट्या कृष्णा खोर्यातून महाराष्ट्रात २६.५८ टक्के म्हणजेच एकूण उपलब्ध पाण्यापैकी एक चतुर्थांशपेक्षा अधिक पाणी उपलब्ध होते. त्यावरून महाराष्ट्रासाठी कृष्णा खोर्यातील पाण्याचे महत्व आपल्या लक्षात येते. कृष्णा खोर्यात महाराष्ट्राचे ६९ लक्ष हेक्टर भौगोलिक क्षेत्र येते. तर त्यापैकी ६ लक्ष हेक्टर म्हणजे मराठवाड्याचे १० टक्के भौगोलिक क्षेत्र येते.

महाराष्ट्रातील एकूण ९४ अवर्षणप्रवण तालुक्यांपैकी ५६ तालुके कृष्णा खोर्यात येतात. तर त्यापैकी १२ अवर्षणप्रवण तालुके मराठवाड्यातील आहेत. त्यामुळे मराठवाड्यासारख्या अवर्षणप्रवण विभागासाठी कृष्णा खोर्याच्या पाण्याचे महत्त्व अधिक आहे.

महाराष्ट्रातील कृष्णा नदीचे खोरे हे प्रामुख्याने कृष्णा उपखोरे आणि भीमा उपखोरे यामध्ये विभागले आहे. उपखोर्याचे क्षेत्र व त्यातून जलनिष्पत्ती म्हणजेच खोरेनिहाय पाणी उपलब्धतेच्या अभ्यासानुसार असे निदर्शनास आले की, २७ टक्के कृष्णा उपखोर्यातून ६५ टक्के जलनिष्पत्ती उपलब्ध होते.

तर ७३ टक्के भीमा खोर्यातील क्षेत्रातून ३५ टक्के जलनिष्पत्ती उपलब्ध होते.

त्यामुळे कृष्णा उपखोर्यातील जास्तीचे पाणी तीव्र टंचाईचे क्षेत्र असलेल्या असलेल्या भीमा खोर्यात वळविण्याची आवश्यकता लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पास फेब्रुवारी २००४ मध्ये रूपये ४९३२.०० कोटी किंमतीसाठी प्रशासकीय मान्यता दिली.

### हिमाचलच्या पुरात १७ पुणेकर

मंगळवारी (१२ जुलै) यातील दहा जणांना बाहेर काढण्यात आले असून ते सुरक्षित ठिकाणी असल्याची माहिती त्यांच्या नातेवाईकांनी मंगळवारी जिल्हा प्रशासनाला दिली. उर्वरित सात जणांशी संपर्क नसल्यामुळे ही माहिती राज्य सरकारला देण्यात आली असून राज्य सरकार हिमाचल प्रदेशच्या स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात आहे.

संबंधितांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरु असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. हिमाचलमध्ये मुसळधार पावसानंतर जनजीवन विस्कळीत झाले आहे. याशिवाय उत्तराखंड, उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि इतर राज्यांमध्येही अशीच परिस्थिती पाहायला मिळत आहे. उत्तर भारतात मुसळधार पावसामुळे झालेल्या या विद्धंसानंतर मदत आणि बचावकार्य सुरु असून एनडीआरएफच्या अनेक तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# टोमॅटो दरवाढीच्या अनुषंगाने उपाययोजनांचा कृषि आयुक्तांनी घेतला आढावा

## उपलब्धतेबाबत अहवाल सादर करण्याचे अधीक्षक कृषि अधिकाऱ्यांना दिले निर्देश

पुणे/प्रतिनिधीः सध्या बाजारात वाढलेले टोमॅटोचे दर व त्याबाबत उपाययोजना करण्यासाठी कृषि आयुक्त सुनील चव्हाण यांच्या उपस्थितीत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. चालू खरीप हंगामातील टोमॅटो पिकाखालील क्षेत्र व उत्पादनाबाबत माहिती तातडीने सादर करण्याचे निर्देश कृषि आयुक्त सुनील चव्हाण यांनी यावेळी दिले.राज्यात टोमॅटो पिकाखाली सर्वसाधारण ५६ ते ५७ हेक्टर क्षेत्र आहे. खरीप हंगामात सर्वसाधारणपणे ४० ते ४२ हजार हेक्टर क्षेत्र तर रब्बी व उन्हाळी हंगामात सर्वसाधारण १६ ते १७ हजार हेक्टर क्षेत्रावर टोमॅटोची लागवड केली जाते. यापासून सर्वसाधारणपणे १० लाख मे. टन उत्पादन अपेक्षित असते. डिसेंबर २०२२ ते मे २०२३ दरम्यान टोमॅटोला अतिशय अल्प दर मिळाल्याने या पिकाच्या नवीन लागवडीवर त्याचा परिणाम झाल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत आहे.तसेच मार्च पासून मे महिन्यापर्यंत अवेळी पाऊस, गारपीट यामुळे टोमॅटो आणि इतर भाजीपाल्याचे नुकसान झाल्याने पिकाच्या उत्पादनावर परिणाम झाल्याचे दिसून येते. यावर्षी पाऊस उशिरा आला असून सरासरीच्या ५४ टक्के पाऊस झाला आहे. त्यामुळे लागवडीस उशीर झाला आहे, असेही यावेळी श्री. चव्हाण यांनी सांगितले.

टोमॅटो पिकावरील कीड व रोग प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने कराव्यात. नाशिक, पुणे, अहमदनगर, सोलापूर, औरंगाबाद, लातूर व नागपूर या जिल्ह्यांमध्ये टोमॅटो लागवडीचे प्रमुख क्षेत्र असून सर्व संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हा अधीक्षक कृषि अधिकाऱ्यांनी नवीन लागवडीबाबत सविस्तर अहवाल सादर करावा, अशा सूचनाही श्री. चव्हाण यांनी यावेळी दिल्या. बैठकीला सर्व कृषि विद्यापिठांचे कुलगुरु, संशोधन संचालक तसेच सर्व जिल्ह्यांचे अधीक्षक कृषि अधिकारी उपस्थित होते.

# संदेश आंबेडकरांच्या नेतृत्वात आंबेडकरी ऐक्य व्हावे : डॉ. राजन माकणीकर



मुंबई : रिपब्लिकन आणी सर्व आंबेडकरी विचारांच्या पक्ष संघटना तसेच संस्थांनी मा. संदेश आंबेडकर यांच्या नेतृत्वात आंबेडकरी ऐक्य कराव असे मत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (संविधान) पक्षाचे राष्ट्रीय मुख्य सचिव डॉ. राजन माकणीकर यांनी व्यक्त केले आहे.

सेना, आघाड्या, पक्ष, संस्था व सर्व आंबेडकरी संघटनांनी वेगवेगळ्या गटा तटातून लढण्या ऐवजी मा. संदेश आंबेडकर साहेबां च्या नेतृत्वात आंबेडकरी ताकत दाखवावी व चाललेले गलिच्छ राजकारण सम्पुष्ठात आणून स्वाभिमानी व सत्तेचे राजकारण असेही तसेच मा. संदेश जिना कोणताही विकल्प न समजून आंबेडकरी मिशन व सत्तेचा संकल्प अस मानावे. असेही डॉ. माकणीकर म्हणाले.

डॉ. राजन माकणीकर असेही म्हणाले की, आप आपल्या गटांना घेऊन मर्यादित राजकारण करण्यापेक्षा सध्या आपसातील मतभेत हेवेदावे दूर करून कोणीही नेतृत्व न करता आपल्या अनुभवातुन राजकारणाला नवी दिशा द्यावी व मा. संदेश आंबेडकरांना ऐक्याचे नेतृत्व करू द्यावे. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब यांचे पंतु असून मा. राजरत्न आंबेडकरांचे मोठे भाऊ आहेत. मा. संदेश आंबेडकर यांना राजकारणातील आंबेडकरी नेतृत्वाची संधी दिली तर ते या संधीच नक्कीच सोन करून दाखवतील. आंबेडकरी संघटना व पक्ष प्रमुखांनां या संदर्भात पत्र देऊन राजकारणाला नवी कलाटणी देण्याचे काम अनुभवी राजकारण्यांनी करावे अशी विनंती आम्ही करनार असल्याचे डॉ. माकणीकर म्हणाले.

# नांदुर्डी जनता विद्यालयात वन महोत्सव दिन साजरा




निफाड/राजेंद्र थोरात :निफाड तालुक्यातील नांदुर्डी येथील जनता विद्यालयात नुकताच वन महोत्सव साजरा करण्यात आला असून या कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आली यावेळी शालेय समिती अध्यक्ष बोराडे तात्या, एकनाथ निकम ,सिताराम ढोमसे, विद्यालयाचे मुख्याध्यापक डावरे डि ए, पर्यवेक्षक बिन्नर बी पी ., म. वी. सेवक सोसायटीचे संचालक जाधव डी.जी,.यांची उपस्थिती होती

याप्रसंगी स्कूल कमिटी अध्यक्ष व ग्रामस्थांनी शालेय आवारात वृक्षारोपण केले असून वन महोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून वृक्षांचे महत्त्व सांगितले आहे, आठवीच्या विद्यार्थ्यांनी नाटक व समूह नृत्याच्या माध्यमातून जीवनातील वृक्षाचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला ,कार्यक्रमाचे अध्यक्ष बोराडे तात्या यांनी शालेय वन महोत्सव कार्यक्रम घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले असून विद्यार्थ्यांना वृक्षारोपण करण्यास प्रवृत्त केल्याबद्दल आभार व्यक्त केले,

यावेळी जेष्ठ शिक्षक शिंदे आर आर, निफाडे बी के, रायते एन ए ,शिंदे टि जी ,पगारे आर व्ही, किरकांडे के ,पी ,डुकरे एन जी , आदी शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते ,कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती मोतिंगे मॅडम यांनी केले तर आभार निफाडे बी.के ,यांनी मांनले,

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे हक्क रजेची रक्कम मिळण्याकामी निवेदन



अक्कलकोट/प्रतिनिधीः सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अक्कलकोट तालुक्यातील सेवानिवृत्त कर्मचार्यांनी प्रशासक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सेवानिवृत्त कर्मचार्यांचे हक्क रजेची रक्कम मिळण्याकामी निवेदन देण्यात आले. याप्रसंगी के.आर.पाटील, एम.सी.दुलंगे, व्ही.जी.दिकसंगी, बी.एम.तारापुरे, के.एस.माडजे, एम.एम.माशाळे, व्ही.एस.हौदे, बी.जी.स्वामी, आर.एम. फुलारी, व्ही.ओ. अरळीमार, एम.के.स्वामी, बी.डी.कोणदे यांच्यासह असंख्य सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा संचित तोटा संपवून बँक मार्च २०२३ अखेर नफ्यात आल्याने प्रशासक कुंदन भोळे व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विलास देसाई यांचेसह सर्व अधिकारी कर्मचार्यांचे अभिनंदन करण्यासाठी अक्कलकोट तालुक्यातील सेवानिवृत्त कर्मचारी भेट घेवून निवेदनाव्दारे मागणी केली आहे.

प्रशासक कुंदन भोळे यांनी सांगितले की, बँकेत सध्या कार्यरत असलेल्या सर्व कर्मचार्यांना बंद असलेल्या हक्क रजेचा पगार अदा करुन कर्मचार्यांना दिलेला आहे. सन २०१६ नंतर सेवानिवृत्त कर्मचार्यांना हक्क रजेपोटी प्रतिवर्षाचा एक पगार दिलेला आहे. परंतु बँकेच्या सेवा नियमानुसार दीड पगार देण्याची तरतूद असल्याने त्याप्रमाणे उर्वरित फरकाची रक्कम देवून सेवानिवृत्तांना दिलासा देण्याची मागणी केल्यानंतर प्रशासकांनी सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल असे आश्वास दिले.

# भरीव शैक्षणिक योगदानामुळे विद्यार्थ्यांचा कल स्वेरीकडे : डॉ.श्रीवस सहस्त्रनामम्



पंढरपूर/प्रतिनिधी : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाचे ज्ञान देवून विद्यार्थ्यांचे करिअर उज्वल करणाऱ्या स्वेरीकडे आता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या बरोबरच पुणे-मुंबई अशा मोठ मोठ्या शहरांमधील विद्यार्थी व पालकांचे लक्ष स्वेरीकडे लागले आहे. स्वेरी ही संस्था स्थापनेपासून शिक्षण क्षेत्रात अतुलनीय योगदान देत आली आहे. स्वेरीतील पंढरपूर पॅटर्न वर आधारित शिक्षण पद्धती, आदर, शिस्त व संस्कार तसेच विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम उत्तम व अनुकरणीय आहेत. स्वेरीची शिक्षणसंस्कृती पाहता स्वेरीतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक योगदान महत्वाचे ठरणार आहे.' असे गौरवोद्गार ग्लासग्लो-स्कॉटलंड (युनायटेड किंगडम) मधील हंटर सेंटर फॉर इंटरप्रेनरशिपचे व्याख्याते डॉ.श्रीवस सहस्त्रनामम् यांनी काढले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगला व स्वेरी सोबस सेंटरला ग्लासग्लो-स्कॉटलंड (युनायटेड किंगडम) मधील हंटर सेंटर फॉर इंटरप्रेनरशिपचे व्याख्याते डॉ. श्रीवस सहस्त्रनामम यांच्यासह सोशल इंटरप्रेनरशिप, मुंबई व स्कूल ऑफ मॅनेंजमेंट लेबर स्टडीज् , टाटा इन्स्टिटयूट चे अधिष्ठाता प्रा. सत्यजित मुझुमदार, टिस इनक्युब फौंडेशन मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुजय दीक्षित, टीम ऑफ टिस इनक्युब फौंडेशन महाराष्ट्रचे आमोद चंद्रात्रे, व व्यवस्थापिका निकिता नार्वेकर हे अधिकारी 'रुरल इंटरप्रेनरशिप इको सिस्टम डेव्हलपमेन्ट' यावर आधारित दोन दिवसाच्या भेटीसाठी आले होते. प्रारंभी स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी सोबसच्या अधिकाऱ्यांचे स्वागत केले. ग्रामीण भागातील उद्योजकता विकासाच्या दृष्टीने मार्गदर्शन करण्यासाठी ते आले होते. त्यांनी पहिल्या दिवशी पटवर्धन कुरोली (ता. पंढरपूर) मधील गुळ निर्मिती केंद्राला व मसाला निर्मिती कारखान्याला भेट दिली तर दुसऱ्या दिवशी त्यांनी पंढरपूर तालुक्यामधील लघु उद्योजकांना स्वेरीमध्ये आमंत्रित करून उद्योजकतेबाबत बहुमोल मार्गदर्शन केले. दि.२५ जानेवारी २०२१ रोजी संस्थेत स्वेरीज 'सोबस सेंटर ऑफ एक्सलन्स'ची स्थापना करण्यात आली. तेंव्हापासून या सेंटरच्या माध्यमातून ग्रामीण उद्योजकता विकासाचे विविध उपक्रम हाती घेण्यात आलेले आहेत. ग्रामीण भागातील नवउद्योजकांना प्रशिक्षण देणे, त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी मदत करणे इ.कार्ये या सेंटरच्या माध्यमातून अविरतपणे सुरू आहेत. दि.२६ जून २०२१ रोजी 'न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड तारापुर, महाराष्ट्र साईट' सोबत ग्रामीण विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असा सामंजस्य करार करण्यात आला. आजपर्यंत जवळपास २९ संशोधन प्रकल्पांसाठी सुमारे दहा कोटी रुपयांचा संशोधननिधी राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजी कमिशन, ए.आर.डी. बी., मॉडरॉब, भाभा अणुसंशोधन केंद्र, डी. एस.टी., युजीसी, बी.आर.एन.एस.,डी. बी.टी. आदी संस्थांकडून प्राप्त झाला असून या निधी मधूनच कांही संशोधन प्रकल्प पूर्ण झाले आहेत तर कांही प्रकल्प पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. या निधीच्या माध्यमातून 'स्वेरी' मध्ये विविध अद्ययावत प्रयोगशाळांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामध्ये ऍडव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंग लॅब, चेन टेस्टिंग लॅब, व्हायब्रेशन अनालिसिस लॅब, एन.डी. टी. लॅब, लोडींग फ्रेम फॅसिलिटी, ऍडव्हान्स्ड डिझाइन अँड सिम्युलेशन लॅब, अँटेना डिझाइन लॅब इ. चा समावेश आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध संस्थांसोबत सुमारे ५० पेक्षा जास्त सामंजस्य करार करण्यात आले असून त्याद्वारे विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या बौद्धिक विकासास आणि तांत्रिक कौशल्य वाढीस चालना मिळत आहे. स्वेरीमध्ये विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षकांसाठी असणाऱ्या संशोधनपूरक वातावरणामुळे आणि प्रोत्साहनपर धोरणामुळे आत्तापर्यंत ७९० पेक्षा जास्त संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले आहेत. स्वेरीतील टेक्नो-सोसायटल च्या शोधनिबंधांना आंतरराष्ट्रीय 'स्कोपस' चा दर्जाही प्राप्त झाला आहे. आजपर्यंत सुमारे ४६ पुस्तके प्रकाशित झाली असून सुमारे २७ पेटंट्स देखील दाखल करण्यात आले आहेत. स्वेरीतील संशोधनाला चालना देण्यासाठी विविध ठिकाणी होणाऱ्या संशोधन कार्यशाळेत येथील प्राध्यापक, संशोधक सहभागी होत असतात आणि अद्ययावत तंत्रज्ञान आत्मसात करत असतात. सोबसच्या आलेल्या पाहुण्यांनी स्वेरीच्या संशोधन विभागाला तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागाला भेट दिली. यावेळी त्यांच्यासमवेत सोबस इन्साईटस् फोरम'चे मुख्य कार्यकारी अधिकारी दिग्विजय चौधरी, स्वेरीचे युवा विश्वस्त प्रा.सुरज रोंगे, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ.प्रशांत पवार, डॉ.विद्याराणी क्षीरसागर, सोबस सेंटरचे गिरीश संपत, प्रशांत मांडके, नितिन कुलकर्णी, डॉ.एम.एम.आवताडे यांच्यासह स्वेरीचे इतर प्राध्यापक उपस्थित होते.

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




अक्कलकोट/प्रतिनिधीः जे. एन सामाजिक संघटना आयोजित किणी येथील नागसेन बुद्ध विहार येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च अँड ट्रेनिंग सेंटर वतीने समता दुत नालंदा शिंदे मॅडम यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धा परीक्षा व संविधान जनजागृती याविषयी कार्यक्रम पार पडला *आज आपल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची कशी तयारी करायची व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना यशदा ट्रेनिंग सेंटर मध्ये जाण्यासाठी कशी तयारी केली पाहिजे

किणी भीमनगर वतीने नालंदा शिंदे मॅडम यांचा सत्कार उर्मिला सोनकांबळे,मनीषा कांबळे,प्रतीक्षा वाघमारे प्रिती जैनजांगडे यांच्या हस्ते करण्यात आले

यावेळी उपस्थित महादेव काका सोनकांबळे,श्रीमंत सोनकांबळे, मनोज सोनकांबळे,जीवन सोनकांबळे ,शिवशंकर सोनकांबळे, अक्षय सोनकांबळे,किशोर जैनजांगडे बसवराज सोनकांबळे,नागराज सोनकांबळे,शेखर जैनजांगडे, बिरूराज जैनजांगडे,नमित माने,दिनेश ख्याले, सिद्धार्थ बनसोडे,समर्थ जाधव उपस्थित होते.यावेळी सागर सोनकांबळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर प्रतीक्षा वाघमारे यांनी आभार मानले

# शब्दकोडे क्र ५७



आडवे शब्द १. मुंबईत २००८ साली झालेल्या अतिरेकी हल्ल्यात वीरगती प्राप्त झालेले तीन प्रमुख अधिकारी ३. अनाथ ११. कारस्थान १२. खंदक १३. अंड्यातील पिवळा भाग १५. मलईदार बासुंदी १७. धोबी १९. गुजराथी नृत्यप्रकार २२. वितरण २३. फळातील द्रव २४. कोलकाताचे विमानतळ २७. ठावठिकाणा २८. युवक २९. विचित्र ३१. बांबूचे कुसळ ३२. केस काळे करण्याचे साधन ३४. गर्दभ ३५. दयाळू ३७. कोर्टातील दावा ३८. बारीक दगड ३९. हट्टी, दुराग्रही ४१. शिखर,ढिगाचा चिंचोळा भाग ४३. बडबड्या ४४. धडक ४८. शाहिरजवळचे एक छोटे चर्मवाद्य ५०. कापडी बंद, फत ५१. एक ध्वज, एक रंग ५२. कडू ५३. खांद्यावरून घेण्याचे वस्त्र ५४. एक सुगंधी पांढरे फूल ५५. नम्र, वाकलेला ५७. काम लांबणे ५९. नुकताच सरलेला दिवस ६०. परीक्षा, निवड ६२. कठीण प्रसंग ६३. वाद्य वाजवणारा ६५. एका घराण्याचे राज्य ६७. प्रश्न ६९. रम्य ७१. कुत्रा ७३. मध्यस्थ ७५. रुचीहीन ७७. पाठोपाठ ७८. पटल ७९. गाव, नगर ८०. मृत्यूदेवता ८२. रक्षण करणारा ८३. आणि ८४. उत्कर्षाचा काळ उभे शब्द १. बांगड्यांचा व्यवसाय करणारा २. छोटा डोंगर ३. बक्षीसाचा पल्ला ४. पदार्थ शिजतानाचा आवाज ५. सारक ६. तात्पर्य ७. कसदार ८. खोडण्याचे साधन ९. कुबड १०. शरीर १४. लुच्चा १६. फासळी १८. जपजाप्य १९. ढीग २०. नड २१. विहीर २२. दुर्गंधी येऊ लागलेला २३. तोफगाडी २५. सुगंधी पाने २६. अंत:करण २७. नमुनेदार २९. अपमान ३०. वाईट याअर्थी लागणारा प्रत्यय, उदा.कुख्यात ह्न नाम ३३. कपाळ ३६. सुदैवी ३७. चिकटविण्यासाठी वापरला जाणारा एक पदार्थ ३८. शाब्दिक हजामत ४०. मातीमोल ४२. मगज ४६. शरीर, अवयव ४७. हुशार, चुणचुणीत ४९. लोकर (इंग्रजी) ५१. लवकर, वेगाने ५३. मेहरबानी ५६. सर्वनाश (हिंदी) ५७. पहारेकरी ५८. झाकणाचे पात्र ५९. कावळा ६१. आवड, रुची ६३. किराणा व्यापारी ६४. कीव करण्याजोगे ६५. ढग, दाट ६६. शाळेतील शिक्षक ६८. सत्ता ७०. सुसर ७१. नाकावाटे हवा घेणे ७२. जनावर ७४. दहाचा संच ७६. वाळूवर रेघा ओढून भविष्य सांगणे ८१. मयूर

# समाजात गट असले तरी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने आम्ही एक आहोत : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले




मुंबई/प्रतिनिधी :आमचा समाज कोणाही विरुध्द नाही. आमच्या विरुध्द कोणी जावु नका. आम्ही कुणावर अन्याय करणार नाही. आमच्यावर कोणी अन्याय केला तर याद राखा, अन्याय सहन केला जाणार नाही. आमच्या समाजात गटतट आहेत. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने आम्ही सर्व एक आहोत. जयभिमच्या बुलंद आवाजाने आम्ही एक आहोत असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले. नाशिकच्या महाकवी कालिदास कलामंदीर सभागृहात रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आयोजित दलित पँथर सुवर्ण महोत्सव सोहळयात ना. रामदास आठवले बोलत होते.

यावेळी आयोजक रिपाइंचे नाशिक जिल्हाध्यक्ष प्रकाश लोंढे, ज्येष्ठ साहित्यीक विचारवंत अर्जुन डांगळे, दिलीप जगताप, रिपाइंचे राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे, रमेश मकासरे, श्रीकांत भालेराव, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मनाली जाधव, रिपाइं महिला आघाडीच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष शिलाताई गांगुर्डे, अनिल गांगुर्डे, आदि अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी दलित पँथर सुवर्ण महोत्सवानिमीत्त दलित पँथरमध्ये काम केलेल्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा ना. रामदास आठवले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

नाशिक जिल्हाध्यक्ष प्रकाश लोंढे यांची यावेळी रिपब्लिकन पक्षाच्या उत्तर महाराष्ट्र विभागाच्या अध्यक्षपदी अधिकृत नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा ना. रामदास आठवले यांनी यावेळी केली. तसेच उत्तर महाराष्ट्राचे प्रभारी म्हणून रिपाइंचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष रमेश मकासरे यांची नियुक्ती ना. रामदास आठवले यांनी यावेळी अधिकृत जाहीर केली. आमच्याच पक्षात गट आहेत असे नाही तर इतरही पक्षात गटतट आहेत. गटबाजीमुळे इतर पक्षातील नेत्यांची एकमेकांवर होणारी आरोपांची चिखलफेक आपण पाहत आहोत, आमच्यात गटतट असले तरी इतर पुढा-यांवर मी कधीही टीका करीत नाही असे ना. रामदास आठवले म्हणाले.

दलित पँथर हे आक्रमक संघटन आहे. पँथर हा सत्ता मागणारा नसतो, पँथर हा संघर्ष करणारा हवा आहे. रिपब्लिकन पक्षाशी संलग्न ठेवून पुन्हा दलित पँथर कशी स्थापन करायची आणि तिचे स्वरुप कसे असेल याबाबत विचारवंताचे आपण मार्गदर्शन घेणार आहोत. दलित पँथरच्या सुवर्ण महोत्सवी सोहळयात पुन्हा दलित पँथर सुरु करा अशी मागणी पुढे आल्याची माहिती ना. रामदास आठवले यांनी यावेळी दिली.

प्रकाश आंबेडकर यांनी सर्व वंचितांना, बहुजनांना एकत्रित करण्याचा प्रयोग चांगला केलेला आहे. मात्र त्यांनी रिपब्लिकन नावाशी फारकत घेतली आहे. रिपब्लिकन हेच नाव व्यापक आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची रिपब्लिकन संकल्पना आहे. रिपब्लिकन नाव सोडुन अन्य नावाने पक्ष चालविणे चुकीचे असल्याचे मत ना. रामदास आठवले यांनी यावेळी व्यक्त केले.

मी कधीच बोललो नाही खोटं
म्हणुन मला याच पँथरने केलं मोठं ;
माझ्या नावाने अनेक लोकांनी मोडली बोटं ;
तरी माझं नेतृत्व झालं मोठं ;
मी कधीच केली नाही कुणाची चाकरी पण मला याच नाशिकच्या आयाबायांनी दिली चटणी भाकरी ;
जयभिमचा बुलंद आवाज ऐकत होतो शाहीरांच्या गाण्यात ..;
म्हणून मी चालत होतो पँथरच्या बाण्यात ; बुध्दांची समता मी ऐकत होतो वामनदादांच्या गाण्यात ! गावागावात फिरत होतो तेव्हा झोपायला मिळत नव्हता मला बेड ; पण मला लागले होते दलित पँथरचे वेड!
बरेच खात होते तुपाशी पण ब-याच वेळा मी राहत होतो उपाशी अशी कविता ना. रामदास आठवले यांनी सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

# वागदरी आरोग्य केंद्रात येत्या पाच दिवसात सुरळीत कामकाज सुरू न झाल्यास संघर्ष सामाजिक संस्थेच्या वतीने आंदोलन

## .अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल : सरपंच श्रीकांत भैरामडगी

वागदरी/प्रतिनिधीः वागदरी ता अक्कलकोट येथील आरोग्य केंद्रात डॉक्टर वेळेत येत नसल्याने रुग्णांना उपचारा अभावी परत जावे लागत आहे हे बाब संघर्ष सामाजिक संस्थेचे अध्यक्ष श्याम बाबर, संस्थेचे उपाध्यक्ष महादेव सोनकवडे, . किरनळी सरपंच सतीश कणमुसे, अस्लम मुल्ला, दत्ता व्हदलुरे संजय आळगे, यांच्याकडे अनेक खेडेगावातील रुग्ण तक्रार केले होते याबाबत पडताळणी करण्यासाठी गेल्या दोन दिवसापासून प्राथमिक आरोग्य केंद्र येथे जाऊन संस्थेने माहिती घेतले असता वेळेवर येत नसल्याचे दिसून आले,

काल सकाळी नऊ वाजता शाम बाबर अचानक भेट दिले असता फक्त तीन कर्मचारी उपस्थित होते या बाबत वागदरी येथील सरपंच , आरोग्य समिती अध्यक्ष, ग्रामपंचायत सदस्य यांना बोलून घेऊन प्रशासनास धारेवर धरल्यावर येत्या पाच दिवसात आरोग्य सेवा सुरळीत चालू होईल असे तालुका वैद्यकीय अधिकारी अश्विन करसखेडे यांनी आश्वासन दिले

वागदरीसह परिसरातील किरनळी भुरिकवठे, खैराट, गोगाव , शिरवळवाडी या परिसरातील नागरीकाना वागदरी आरोग्य केंद्रात वेळेवर उपचार मिळत नाही त्यामुळे ग्रामीण भागातील आलेल्या लोकांना उपचार न घेता परत जावे लागत आहे याबाबत प्राथमिक आरोग्य केंद्रास सरपंच श्रीकांत भैरामडगी आरोग्य समिती अध्यक्ष शिवा घोळसगाव , संघर्ष सामाजिक संस्था अध्यक्ष श्याम बाबर, व गावातील नागरिक अचानक भेट दिले असता त्याठिकाणी फक्त तीन कर्मचारी हजर होते




या ठिकाणी नेमणुकीस असलेले डॉक्टर बिराजदार गैरहजर होते त्यांच्या गैरहजेरीत डॉ लिंगराज नडगेरी हजर होते काही कर्मचारी चार चार दिवसांचे मस्टरला सही अगोदर करुन जातात असे निर्देशनास आले. सहा महिने पुर्वी सरपंच व आरोग्य समिती अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते सोलापूर जिल्हा आरोग्य अधीक्षक यांना भेटुन वागदरी आरोग्य केंद्रात कर्मचाऱ्यांची संख्या खूप कमी आहे.

व कर्मचारी वेळेवर येत नाही असे तक्रार ग्रामपंचायत ठराव करून व गावातील पाचशे नागरिकांकडून सहीचे निवेदन देण्यात आले होते त्यावेळी जिल्हा विस्तार अधिकारी नेटोरे वागदरी आरोग्य केंद्रात येऊन सरपंच , समिती अध्यक्ष व गावातील नागरिकांना समवेत मिटिंग लावून सर्व काही सुरळीतपणे सुरू करतो यापुढे असं घडणार नाही, वागदरीसह नागरीकाना वेळेवर उपचार मिळेल व सर्व कर्मचारी वेळेवर येतील असे म्हणाले.तरी देखील आज पर्यंत एकही कर्मचारी वेळेवर येत नाही व वागदरी नागरीकाना वेळेवर उपचार मिळत नसल्याने सरपंच, समिती अध्यक्ष व गावातील नागरिक आरोग्य केंद्रास अचानक भेट देऊन पाहणी केली असता फक्त तीन कर्मचारी हजर होते असे निर्देशनास आहे व जिल्हा विस्तार अधिकारी व अक्कलकोट तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्याशी संपर्क करून आरोग्य केंद्रातील अडचणी व समस्याचे माहिती आरोग्य समिती अध्यक्ष शिवा घोळसगाव यांनी संपूर्ण माहिती दिली तरी संबंधित अधिकारी पाच दिवसांत सर्व काही सुरळीत करतोय असे आश्वासन दिले. जर पाच दिवसांत सुरळीतपणे नाही झाल्यास संघर्ष सामाजिक संस्था व गावातील नागरिकांकडून डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक वागदरी येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल असे सरपंच श्रीकांत भैरामडगी व शाम बाबर यांनी सांगितले यावेळी शिवा घोळसगाव, ग्रां प सदस्य पंकज सुतार, राजकुमार हुग्गे, संजय चौगुले, शरण सुरवसे, मृगेंद्र मुंदिनकेरी यासह अनेक नागरिक उपस्थित होते

# दुधनी शहरात पंधरादिवस झाले नळाला पाणी नाही; अन् रेणुका नगर येथे दोन महिन्यापासून घंटा गाडी नाही

अक्कलकोट/ निंगप्पा निंबाळः अक्कलकोट तालुकातील दुधनी-शहरातील गेल्या पंधरादिवसांपासून नगरपालिकेने नळाला पाणी सोडले नाही, त्यामुळे लोकांनी ज्यांच्या घरात बोअरवेल आहे त्यांच्या घरात पाणी मागितले असता ते म्हणाले की ह्यावर्षी उन्हाळा कडक होता आणि आजपर्यंत पाऊस पडलाच नाही, आमच्या बोरमध्ये पाणी कमी झाले आहे, आम्हालाच दोन- तीन दिवसातुन पाणी मिळते, तसेच लाईट बिलही जास्त येते आम्ही तुम्हाला पाणी कुठून द्यायचे ?असे म्हंटल्यावर सर्वसामान्यांचे पाण्याविना घाम सुध्दा फुटत नाही असे समोरास आले आहे. वैतागलेले दुधनी नागरिकांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आतिष वाळुंजे यांना भेट घेऊन पाणी समस्या, घंटा गाडी समस्या, गटारातील कचरा काढणे बाबत ई.




माहिती विचारले असता !

मुख्याधिकारी आतिष वाळुंजे यांनी उत्तर असे देतात की गाळ काढत आहे त्यामुळे पाणी येत नाही, किती दिवस येत नाही साहेब? जागेचा भाडा भरले का?नळ पट्टी भरले का? असे अनेक प्रश्न विचारले जातात. माजी नगराध्यक्ष, माजी नगरसेवक यांना विचारले असता आम्ही कुठल्याही पदावर नाही, सध्या प्रशासकीय राजवट चालु आहे त्यामुळे मुख्याधिकारी यांना सांगा. असे एकावर एक प्रशासन व माजी नगरसेवक म्हंटले असल्याने सर्व सामान्यांचे जिव मुठीत आला आहे.

तसेच स्वच्छ भारत अभियानांतर्गत अनेक ठिकाणी दुधनी येथे ब्रिद वाक्य व पोष्टर लावले आहेत, मुळात दुधनी तसे आहे का? म्हणून दुधनीतील सुज्ञ नागरिक रेणुका नगर ( वडार गल्ली) येथील शंकर. ह.गोटे यांनी प्रश्न केला आहे.रेणुका नगर येथे गेल्या दोन महिन्यांपासून गटार स्वच्छता झालेला नाही तसेच दोन महिन्यांपासून घंटा गाडी देखील आलेला नाही, साफ सफाई नाही, त्यामुळे शहरात डासांचे प्रमाण वाढुन लहान मुले व वृद्ध व्यक्तींना मलेरिया सारख्या आजारांना बळी पडत आहेत. रेणुका नगर येथील महिलांना घरातील कचरा, कुठे टाकावा हा प्रश्न पडला आहे. ह्या दोन्ही प्रश्न बसवराज हौदे व शंकर गोटे यांनी दिले आहे.

# जिल्हयातील नागरिक व विद्यार्थ्यांनी डिजिटल इंडिया सप्ताहात सक्रिय सहभाग घ्यावा

**केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या वतीने दिनांक २५ ते ३१ जुलै २०२३ या कालावधीत डिजिटल इंडिया सप्ताहाचे आयोजन**

सोलापूर/प्रतिनिधी : केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या वतीने दिनांक २५ ते ३१ जुलै २०२३ या कालावधीत डिजिटल इंडिया सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिक व विद्यार्थ्यांनी या सप्ताहात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी केले आहे.

डिजिटल इंडिया सप्ताहाचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते दिनांक २५ जुलै २०२३ रोजी होणार आहे. तर पुढील सहा दिवस नवी दिल्ली येथील राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राच्या वतीने माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील सायबर सिक्युरिटी, ब्लॉक चेन टेक्नॉलॉजी, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डिजिटल शासन, आयओटी आदी विषयावर राष्ट्रीय स्तरावर ऑनलाइन सेमिनार आयोजित करण्यात आलेले आहेत. या सेमिनारमध्ये संबंधित विषयाच्या तज्ञाकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.जिल्ह्यातील महाविद्यालये, विशेषतः औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन आणि अभियांत्रिकी महाविद्यालये, यांनी विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी डिजिटल इंडिया सप्ताह चे सर्व कार्यक्रमाचे प्रक्षेपण संबंधित महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये उपलब्ध करून द्यावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी शंभरकर यांनी दिले आहेत.

या सेमिनार मध्ये सामान्य नागरिक, विद्ध्यार्थी भाग घेवू शकणार आहेत. सेमिनार मध्य भाग घेण्यासाठी http://www.nic.in/diw2023-reg/ hया लिंकवर वैयक्तीक रित्या नोंदणी करावयाची आहे. नोंदणी करताना आपला मोबाइल नंबर व ईमेल चा पत्ता नोंदवून सबमिट केल्यावर, मोबाइल वर ओटीपी येवून पडताळणी होईल व त्या नंतर डिजिटल इंडिया सप्ताह च्या सूचना तुमच्या नोंदणीकृत मोबाइल वर प्राप्त होतील, अशी माहिती जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी कुलकर्णी यांनी दिली आहे.

या कार्यक्रमाची अधिक माहिती सोलापूर जिल्ह्याचे अधिकृत संकेतस्थळhttps://solapur.gov.inयेथे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिक व विद्यार्थ्यांनी नोंदणी करून केंद्र सरकारच्या या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे

# माता रमाबाई आंबेडकरनगर गोळीबारकांडातील शहीदांना केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवलेंनी वाहिली आदरांजली

मुंबई : माझ्या विरुध्द बोलणा-यांचा मला येत नाही राग, कारण माझ्या मनात पेटली आहे दलितांना न्याय मिळवुन देण्याची आग अशी कविता सादर करुन आपण निळा झेंडा उंच फडकवत प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या मंत्रीमंडळात पोहचलो आहोत. मागच्या दाराने गेलो नाही असा टोला रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी आपल्या विरोधकांना लगावला. माता रमाबाई आंबेडकरनगर गोळीबारकांडात शहीद झालेल्या भिमसैनिकांच्या २६ व्या स्मृतीदिनी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आयोजित जाहीर आदरांजली सभेत ना.रामदास आठवले बोलत होते.



माता रमाबाई आंबेडकर नगरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाची ११ जुलै १९९७ रोजी विटंबना झाल्याच्या निषेधार्थ येथील आंबेडकरी अनुयायांनी तिव्र निषेध आंदोलन केले. त्यावेळी एसआरपीच्या जवानांनी आंबेडकरी अनुयायांवर एसआरपीचे पोलीस निरीक्षक मनोहर कदम यांच्या आदेशाने बेछुट गोळीबार केला. त्यात ११ भिमसैनिक शहीद झाले. शहीदांच्या २६ व्या स्मृतीदिनी ना. रामदास आठवले यांनी सर्व शहीदांना विनम्र आदरांजली अर्पण केली. येथील शहीद स्मारकातील सर्व शहीदांच्या प्रतिमांना ना. रामदास आठवले यांनी पुष्प वाहुन विनम्र श्रध्दांजली अर्पण केली. माता रमाबाई आंबेडकर नगरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाच्या विटंबनेतील गुन्हेगाराचा शासनाने अद्याप शोध लावलेला नाही. तसेच निरपराध आंबेडकरी अनुयायांवर बेछुट गोळीबार करणा-या एसआरपीचे पोलीस निरीक्षक मनोहर कदम यांना कठोर शिक्षा झाली नसल्याची तिव्र नाराजी यावेळी सर्व वक्त्यांनी व्यक्त केली. माता रमाबाई आंबेडकर नगरात दरवर्षी ११ जुलैला रिपब्लिकन पक्षाच्या वतीने शहीदांना विनम्र श्रध्दांजली अर्पण करणा-या जाहीर सभेचे आयोजन केले जाते. त्यास ना.रामदास आठवले हे देशात कुठे असले तरी या सभेस उपस्थित राहुन शहीदांना श्रध्दांजली अर्पण करतात.माता रमाबाई आंबेडकर नगरातील झोपडीवासी आणि चाळीत राहणा-या रहिवाशींना चांगली व पक्की घरे मिळवुन देण्याचे आपण प्रयत्न करीत असल्याचे ना. रामदास आठवले म्हणाले.

यावेळी रिपाइंचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे , मुंबई अध्यक्ष सिध्दार्थ कासारे, सुरेश बारशिंग, डी.एम. चव्हाण, बाळासाहेब गरुड, डॉ. हरीश अहिरे, चिंतामण गांगुर्डे, श्रीकांत भालेराव, राजा गांगुर्डे, श्रीधर साळवे, चंद्रशेखर कांबळे, ईशान्य मुंबई जिल्हाध्यक्ष अजित रणदिवे, भारती गुरव, शशिकला जाधव, रवि नेटवटे, लोकशाहीर प्रभाकर पोखरीकर ;विजय वंजारी आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# महाराष्ट्रात परदेशी गुंतवणुकीसंदर्भातील सामंजस्य करारांबाबतचा कृती आराखडा तयार करावा :डॉ.नीलम गोऱ्हे

मुंबई : राज्यात होणारी परदेशी गुंतवणूक आणि परदेशातील विविध उद्योग संघटनांबरोबर आतापर्यंत केलेले सामंजस्य करार आणि त्यावरील कार्यवाहीचा आढावा घेवून या करारांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कृती आराखडा तयार करावा, अशा सूचना विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिल्या.

विधानभवनात आज सायंकाळी उपसभापती डॉ. गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली उद्योजक संघटना व उद्योग विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे रवींद्र पवार, उद्योजकांचे प्रतिनिधी सौरभ शहा, उपसभापती डॉ. गोऱ्हे यांचे विशेष कार्यकारी अधिकारी रवींद्र खेबुडकर, अविनाश रणखांब, मानसी पाटील यांच्यासह अमेरिकन- महाराष्ट्र विकास परिषदेचे मुकुंट कुटे व किशोर गोरे हे न्यू जर्सी येथून दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, राज्य शासनाने गुंतवणुकीसंदर्भात विविध सामंजस्य करार केले आहेत. या करारांबाबतची माहिती संबंधित विभागांनी अद्ययावत करून त्यांच्या अंमलबजावणीसाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करावा. या करारांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येईल. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने आपल्यास्तरावरून या करारांबाबतची माहिती घ्यावी. तसेच लहान व मध्यम उद्योजकांना निर्यात वाढविण्यासाठी मार्गदर्शन करावे. त्यासाठी उद्योग संघटनांच्या सहकार्याने कार्यशाळेचे आयोजन करावे. यासंदर्भात लवकरच व्यापक आढावा घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.उद्योग विकास आयुक्त श्री. कुशवाह



यांनी सांगितले की, राज्य शासन येत्या पाच वर्षांत निर्यात दुप्पट होण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्यासाठी शासन पातळीवरून आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील. प्रत्येक जिल्हानिहाय कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. उद्योगांसाठी आवश्यक पायाभूत सोयीसुविधांचे बळकटीकरण करण्यात येत आहे. याबाबत उद्योजकांमध्ये जनजागृतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे, असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे श्री. पवार यांनी परदेशी गुंतवणूक आणि परदेशातील विविध उद्योजक संघटनांबरोबर झालेल्या सामंजस्य करारांची सविस्तर माहिती दिली. श्री. कुटे यांनी सांगितले की, भारत आणि अमेरिकेत लघु आणि मध्यम उद्योजकांना व्यवसायाची संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. त्यांना अमेरिकन- महाराष्ट्र विकास परिषद सर्वतोपरी सहकार्य करेल. निर्यात वाढविण्यासाठी लघु व मध्यम उद्योजकांना प्रोत्साहन आणि मार्गदर्शनाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उद्योजकांचे प्रतिनिधी श्री. गोरे, सौरभ शहा यांनी मनोगत व्यक्त केले. विशेष कार्य अधिकारी श्री. खेबुडकर यांनी आभार मानले.